## महात्मा फुले महाविद्यालय , अहमदपूर जि. लातूर
## च्या वतीने ग्रामिण भागात कोरोना सर्वे



कोविड-१९ सर्वे करतांना
एन.एस.एस. कार्यक्रमाधिकारी
डॉ. पी.डी. चिलगर व विद्यार्थी



# महात्मा फुले महाविद्यालयाच्या वतीने 'माझे कुटुंब; माझी जबाबदारी' मोहिम

दै. वतनवाला, दि. ३० सप्टेंबर २०२०

**अहमदपूर (प्रतिनिधी)**

येथील महात्मा फुले महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाराष्ट्र शासन, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड व प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांच्या आदेशान्वये तसेच कार्यक्रमाधिकारी डॉ. पांडुरंग चिलगर यांच्या मार्गदर्शनाखाली माझे कुटुंब माझी जबाबदारी ही मोहीम यशस्वीपणे राबविण्यात आली.



याबाबतचे सविस्तर वृत्त असे की महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने ' कोविड – १९ ' च्या सर्व नियमांचे पालन करून दि. २४ सप्टेंबर २०२० या एनएसएस दिनाचे औचित्य साधून दिनांक २४ ते २९ सप्टेंबर या दरम्यान युट्युब, व्हाट्सअप सारख्या समाज माध्यमांचा आधार घेऊन एनएसएसच्या स्वयंसेवकांनी आपापल्या गावी ' माझे कुटुंब ;माझी जबाबदारी' या अभियानाबाबत जनजागरण करून, आपली सामाजिक जबाबदारी पार पाडली. या सर्व विद्यार्थ्यांना कार्यक्रम अधिकारी डॉ. पांडुरंग चिलगर यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कार्यालयीन कर्मचाऱ्यांनी मार्गदर्शन केले.





# गांधीजींचे विचार आचरणात आणण्याची गरज : पाटील

पुढारी

2-2-2021



**अहमदपूर पुढारी वृत्तसेवा** : महात्मा गांधींनी दक्षिण आफ्रिकेतून सामाजिक चळवळीला प्रारंभ केला. तिथेच त्यांना वंशभेद आणि वर्णभेदाची जाणीव झाली. भारतात परतल्यानंतर त्यांनी भारतातील अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी प्रयत्न सुरू केले. मात्र, आजही अनेक प्रश्न कायम आहेत. महात्मा गांधींच्या स्वप्नातील भारत साकार करण्यासाठी गांधीजींच्या विचारांना आचरणात आणण्याची गरज आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय सेवा योजनेचे लातूर जिल्हा समन्वयक प्रा. डॉ. संतोष पाटील यांनी केले.

येथील महात्मा फुले महाविद्यालयात विद्यार्थी ऑनलाईन प्रबोधन पंधरवडानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित विशेष व्याख्यानात ते बोलत होते. आभासी तथा दूरदृश्य प्रणाली (झुम) च्या माध्यमातून घेण्यात आलेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील हे होते. प्रारंभी राष्ट्रपिता महात्मा गांधींना अभिवादन करून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. डॉ. संतोष पाटील म्हणाले की, महात्मा गांधींनी या देशालाच नव्हे तर संपूर्ण जगाला अहिंसा शिकविली त्याचबरोबर स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले.

अध्यक्षीय समारोपात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.वसंत बिरादार पाटील म्हणाले की, महात्मा गांधींनी शारीरिक स्वच्छतेबरोबरच मानसिक स्वच्छतेचे ही महत्त्व सांगितले असून, आजच्या काळात खऱ्याअर्थाने महात्मा गांधीजींचे विचार आचरणात आणले तर कोरोना बरोबरच जगातली सगळी रोगराई दूर होईल.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा .डॉ. पांडुरंग चिलगर यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ. सतीश ससाणे यांनी केले. यावेळी आभासी तथा दूरदृश्य ( झुम) प्रणालीच्या माध्यमातून प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येंने उपस्थित होते.

# किसान शिक्षण प्रसारक मंडळ, उदगीर

# महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर

## जि. लातूर 413515




